

अधर्मावर धर्माचा विजय , अन्यायावर न्यायाचा विजय
वाईटावर चांगल्याचा विजय, हाच आहे दसऱ्याचा सण

# विजयादशमी

निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा !




Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

दैनिक

# युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2026-28
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264

वर्ष १९ वे । अंक २५६ । किंमत - ६ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) । मंगळवार । २०/१०/२०२६ । पाने- ०४





# संगमनेरमध्ये महिलांच्या गळ्यातील दागिने ओरबाडले, भरदिवसा दोन ठिकाणी घडल्या घटना




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- शहरात भरदिवसा महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने ओरबाडून पळ काढण्याच्या दोन घटना रविवारी घडल्या. महाराष्ट्र बँकेजवळ जानताराजा रोडच्या दिशेने जाणाऱ्या सोनाली होलार यांच्या गळ्यातील सोन्याचे गंठण, तर नाशिक-पुणे महामार्गावरील १३२ केव्ही परिसरातील साईश्रद्धा रोडवर निर्मला वसंत तळेकर यांचे सोन्याचे मंगळसूत्र चोरट्यांनी हिसकावून नेले. एकाच दिवशी दोन ठिकाणी घडलेल्या या घटनांमुळे शहरातील महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

पहिली घटना रविवारी सकाळी सुमारे अकरा वाजण्याच्या सुमारास महाराष्ट्र बँकेजवळ घडली. सोनाली होलार या मुलांना शाळेत सोडून घरी परतत होत्या. त्यावेळी जानताराजा रोडच्या दिशेने जाणाऱ्या एका तरुणाने त्यांच्यावर अचानक झडप घातली. रस्त्याच्या कॉर्नरवर डीपी आणि झाड असल्यामुळे त्यांना मागे सरकण्याची संधीही मिळाली नाही. संबंधित तरुण फोनवर बोलत बोलत त्यांच्या समोर आला आणि अचानक त्यांच्या गळ्यातील सोन्याचे गंठण ओढून पळून गेला.

या घटनेनंतर होलार यांनी चोरट्याचा जानताराजा रोडमार्गे राजपाल क्लॉथपर्यंत पाठलाग केला. मात्र, तोपर्यंत चोरटा पसार झाला होता. भरवस्तीत आणि दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली.

दुसरी घटना सकाळी सुमारे साडेदहा वाजता नाशिक-पुणे महामार्गावरील १३२ केव्ही परिसरातील साईश्रद्धा रोडवर घडली. निर्मला वसंत तळेकर या रस्त्याने पायी जात असताना दुचाकीवरून आलेले दोन जण त्यांच्या जवळ थांबले. त्यातील साधारण ५० वर्षांचा, शरीराने स्थूल असलेल्या व्यक्तीने तळेकर यांना उद्देशून, 'तुम्ही रस्त्यातून चालता का? रस्त्याच्या मधून असे चालू नका,' असे म्हटले.

त्याच्या बोलण्यामुळे तळेकर यांनी मागे वळून रस्त्याच्या कडेने जाण्याचा प्रयत्न केला. त्याच क्षणी या भामट्याने त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र ओरबाडून घेतले आणि दुचाकीवरून साथीदारासह पलायन केले. तळेकर यांनी आरडाओरड केली; मात्र चोरटे वेगाने पसार झाले. दोन्ही घटनांनंतर संबंधित महिला संगमनेर शहर पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेल्या. तेथे त्यांना बराच वेळ बसून राहावे लागल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर त्यांच्या तक्रारीवरून अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले. भरदिवसा महिलांच्या गळ्यातील दागिने हिसकावून नेण्याच्या घटना घडत असताना तातडीने तक्रारींची दखल घेऊन चोरट्यांचा शोध घेणे आवश्यक असल्याची भावना व्यक्त होत आहे.

**सध्या सणासुदीचे दिवस सुरू असून, दुसरीकडे दुष्काळी परिस्थितीमुळे नागरिक आधीच विविध समस्यांना सामोरे जात आहेत. अशा परिस्थितीत शहरासह ग्रामीण भागात चोरी आणि लुटमारीच्या घटनांबाबत नागरिकांमध्ये चिंता वाढत आहे. विशेषतः शाळेत मुलांना सोडण्यासाठी जाणाऱ्या, बाजारपेठेत खरेदीसाठी निघणाऱ्या आणि रस्त्याने एकट्या पायी जाणाऱ्या महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चोरट्यांकडून महिलांना लक्ष्य करून दागिने हिसकावण्याचे प्रकार रोखण्यासाठी पोलिसांनी गस्त वाढवावी, सीसीटीव्ही फुटेज तपासावे आणि संशयितांचा तातडीने शोध घ्यावा, अशी मागणी नागरिकांकडून होण्याची शक्यता आहे. शहरातील वर्दळीच्या भागांतही महिला सुरक्षित नसतील, तर सामान्य नागरिकांनी विश्वास ठेवायचा कुणावर, असा सवाल या घटनांमुळे उपस्थित होत आहे.**

# कळसकर गुरूजींचे कार्य दीपस्तंभाप्रमाणे - डॉ. संजय मालपाणी





## राज्यपुरस्कार प्रदान

संगमनेर (प्रतिनिधी ) एक शिक्षक उभा राहिला की संपूर्ण समाज बदलत असतो.सर्व पुरस्कार प्राप्त शिक्षक व शाळा यांचे काम हे अद्भुत असेच आहे.ज्यांना ज्यांना पुरस्कार मिळाले आहे त्यांनी ते पुरस्कार नाही तर प्रसाद समजावा असे प्रतिपादन संगमनेर येथील शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष व उद्योजक डॉ. संजय मालपाणी यांनी केले.

राष्ट्रपती पारितोषिक विजेते सोमनाथ कळसकर गुरुजी प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारे राज्यस्तरीय आदर्श शाळा व आदर्श शिक्षक या पुरस्कारांचा वितरण सोहळा काल रविवारी संगमनेर येथील मालपाणी लॉन्स येथे शिक्षणतज्ज्ञ व गीता परिवाराचे अध्यक्ष डॉ. संजय मालपाणी यांच्या शुभहस्ते झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक सोमनाथ कळसकर गुरुजी प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा उद्योजक रामनाथ कळसकर होते. यावेळी राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त सोमनाथ कळसकर गुरुजी,पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर गोंटे,सौ. नलिनी कळसकर,पुरस्कारप्राप्त शाळांचे मुख्याध्यापक व पुरस्कार प्राप्त शिक्षक हे व्यासपीठावर उपस्थित होते.

डॉ. मालपाणी म्हणाले की,कळसकर गुरुजींनी संगमनेर येथे कळसकर विद्यालय सुरु केले.शिक्षण व्यवस्थेवर आज सगळ्यात मोठा प्रश्न उपस्थित झालेला आहे आणि याचे उत्तर शोधण्याचं काम आपल्याला, तुम्हाला आम्हाला सगळ्यांना करावा लागणार आहे.

सोमनाथ कळसकर गुरुजी म्हणाले कंजारभाट समाज शिक्षणापासून वंचित होता.घुलेवाडी येथे बदली झाल्यावर त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. व ती मुले शिकली. या समाजातील मुले आज वेगवेगळ्या क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहे.या समाजातील विद्यार्थ्यांसाठी केलेल्या कामामुळे मला राष्ट्रपती पुरस्कार मिळाला. याचा मला मनस्वी आनंद आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धनगर वस्ती, देवदैठण ता. जामखेड, जि. अहिल्या नगर येथील शिक्षक लहू बोराटे व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आनंदगाव, ता. माजलगाव, जि. बीड येथील शिक्षक नारायण झोडगे यांना सन्मानचिन्ह, सन्मान पत्र व रोख रक्कम १५ हजार रुपये देत राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.तसेच जि प प्राथमिक शाळा वडगाव आनंद ता. जुन्नर जि पुणे व जि प प्राथमिक शाळा भापकर वस्ती ता. शेवगाव जिल्हा अहिल्यानगर या शाळांना सन्मानचिन्ह, सन्मान पत्र व रोख रक्कम ५ हजार रुपये देत राज्यस्तरीय आदर्श शाळा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी सी.ए.वैष्णवी किशोर अभयेकर हिचाही विशेष सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक व स्वागत पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर गोंटे यांनी केले.पाहुण्यांचा परिचय गणेश बाहेती व ॲड. रंजना गवांदे यांनी करून दिला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोमनाथ मदने यांनी केले तर आभार अशोकराव नवले यांनी मानले.

## नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याचा ३१ ऑक्टोबरला प्रारंभ

नाशिक (प्रतिनिधी)

नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा पर्वाचा शुभारंभ ३१ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजून २ मिनिटांनी होणार आहे. या ऐतिहासिक पर्वाच्या प्रारंभानिमित्त नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे एकाच वेळी ध्वजारोहण करण्यात येणार आहे. त्याच दिवशी सायंकाळी नाशिकमधील रामकुंड परिसरात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य महा गोदा आरतीचे आयोजन करण्यात आले आहे. या आरतीमध्ये तब्बल ६५०० आदिवासी बांधव सहभागी होणार असून, या माध्यमातून विश्वविक्रम नोंदवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या प्रारंभानिमित्त दोन विश्वविक्रम करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. अनंत विजय शंखनाद संस्था, रामतीर्थ गोदावरी सेवा समिती आणि पुरोहित संघ यांच्या संयुक्त सहकार्याने शंखनाद आणि महा गोदा आरती हे उपक्रम राबवले जाणार आहेत.कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनी यासंदर्भात माहिती दिली. यापूर्वी गोदा आरतीमध्ये सुमारे १४०० जणांनी सहभाग घेतला होता. आता हा आकडा वाढवून एकाच वेळी ६५०० जणांच्या सहभागातून महा गोदा आरती करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यासाठी प्रशासन आणि आयोजक संस्थांकडून नियोजन व तयारी सुरू आहे.

महा गोदा आरतीसाठी नाशिक जिल्ह्यातील पेठ, सुरगाणा, त्र्यंबकेश्वर, दिंडोरी आणि निफाड यांसह सात तालुक्यांमधील ६५० गाव-पाड्यांतील आदिवासी बांधव सहभागी होणार आहेत. प्रत्येक गावातून सहा पुरुष आणि चार महिलांचा सहभाग असेल, असे नियोजन करण्यात आले आहे.

# उद्योजक राणा सूर्यवंशी यांच्यावर हल्ला



बारामती - एकीकडे मुंबईमध्ये अभिनेता टायगर श्रॉफवर गोळीबार झाला आहे. तर दुसरीकडे पुण्यातील प्रसिद्ध उद्योजकावरही हल्ला झाल्याची घटना समोल आली आहे. बारामती विमानतळ परिसरात राणा शिपिंग कंपनीचे मालक राणा सूर्यवंशी यांच्यावर हल्ला झाल्याची घटना समोर आली आहे. सायंकाळीसाडेसातच्या सुमारास घडलेल्या या घटनेत त्यांच्या हाताला मोठा मार लागला आहे. जखमी सूर्यवंशी यांना तातडीने बारामतीतील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू करण्यात आले आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, राणा सूर्यवंशी विमानतळ परिसरात असताना अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्यावर हल्ला चढवला. पुष्पगुच्छ देण्याच्या बहाण्याने हल्लेखोर त्यांच्याजवळ आले. त्यानंतर अचानक जवळून गोळीबार करून त्यांनी घटनास्थळावरून पळ काढल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर सूर्यवंशी यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. त्यांच्या प्रकृतीबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नाही. त्यांच्यावर झालेल्या हल्ल्यामागील कारणही अद्याप स्पष्ट झालेले नाही.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे हल्लेखोरांचा शोध घेतला जात आहे. हा हल्ला व्यावसायिक वादातून झाला की त्यामागे अन्य काही कारण आहे, याचा तपास पोलीस करत आहेत.

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर डॉक्टरांनी पाणी बचतीची जनजागृती करावी – आ. डॉ. लहामटे



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक असून, डॉक्टरांनी रुग्णांच्या माध्यमातून गावोगावी पाणी बचतीची जनजागृती करावी, असे आवाहन आमदार डॉ. किरण लहामटे यांनी केले.

अकोले तालुका मेडिकल असोसिएशनच्या वतीने आयोजित 'आत्मा शारदीय नवरात्रोत्सव २०२६ व भव्य रास-दांडिया महोत्सव' महाराजा लॉन्स येथे उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाला नाशिक पदवीधर मतदारसंघाचे माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, अकोले नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सोनाली नाईकवाडी यांच्यासह वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आमदार डॉ. लहामटे यांनी असोसिएशनच्या आरोग्यविषयक जनजागृती मोहिमा, आरोग्य तपासणी शिबिरे आणि सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले. डॉक्टरांचा समाजाशी थेट संपर्क असल्याने त्यांनी आरोग्यसेवेबरोबरच पाणी बचत, जलसंवर्धन आणि पर्यावरण संरक्षणाबाबतही जनजागृती करावी, असे त्यांनी सांगितले. माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी असोसिएशनच्या रुग्णहिताच्या आणि समाजोपयोगी उपक्रमांचे कौतुक केले. तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे डॉक्टरांमध्ये आनंद, उत्साह आणि एकोपा वाढण्यास मदत होते, असे मत व्यक्त केले.

नगराध्यक्षा सोनाली नाईकवाडी यांनी 'आत्मा भवन'साठी नियोजित जागा उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक आश्वासन दिले. तसेच असोसिएशनच्या सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रमांना सहकार्य करण्याची ग्वाही दिली. असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. संदीप कडलक यांनी मान्यवरांचे स्वागत केले. डॉ. मंजुश्री राहणे व डॉ. अनुप्रिता शिंदे यांनी सूत्रसंचालन केले, तर सचिव डॉ. प्रतीक घोडके यांनी आभार मानले. रंगीबेरंगी पारंपरिक पोशाख, तालबद्ध संगीत आणि डॉक्टरांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे रास-दांडिया महोत्सव रंगला. आरोग्यसेवा, सामाजिक बांधिलकी आणि सांस्कृतिक एकोपा यांचा संगम घडविणारा हा उपक्रम उत्साहात पार पडला.

# साडेतीन शक्तीपीठांचं एकत्रित दर्शन

## कोल्हार भगवतीपूरचं वैशिष्ट्यपूर्ण मंदिर



विजयादशमी म्हणजे विजय, मांगल्य आणि नव्या संकल्पांचा उत्सव! नवरात्रोत्सवातील नऊ दिवस आदिशक्तीची आराधना केल्यानंतर दसऱ्याच्या दिवशी देवीच्या दर्शनासाठी भाविक मंदिरांकडे धाव घेतात. महाराष्ट्रात साडेतीन शक्तीपीठांना विशेष धार्मिक महत्त्व असून, या शक्तिस्थानांच्या दर्शनासाठी वर्षभर भाविकांची गर्दी होत असते. मात्र, अहिल्यानगर जिल्ह्यातील कोल्हार भगवतीपूर येथील भगवती मातेच्या मंदिरात एकाच ठिकाणी साडेतीन शक्तीपीठांचे दर्शन घडते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. त्यामुळे विजयादशमीच्या निमित्ताने या अनोख्या देवस्थानाचे महात्म्य जाणून घेणे औचित्याचे ठरते.

महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांमध्ये कोल्हापूरची आई अंबाबाई, तुळजापूरची तुळजाभवानी, माहूरगडची रेणुका माता आणि वणी येथील सप्तशृंगी देवीचा समावेश होतो. या चारही देवस्थानांना महाराष्ट्राच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेत महत्त्वाचे स्थान आहे. नवरात्रोत्सवात या मंदिरांमध्ये भाविकांची मोठी गर्दी होते. मात्र, अंतर, प्रवास आणि वेळेच्या मर्यादांमुळे प्रत्येकाला सर्व शक्तिपीठांचे दर्शन घेणे शक्य होतेच असे नाही. अशा भाविकांसाठी कोल्हार भगवतीपूर येथील भगवती मातेचे मंदिर विशेष श्रद्धास्थान मानले जाते.

**लोटांगण बाबांना देवीचा दृष्टांत**

कोल्हार भगवतीपूर येथील भगवती मातेच्या मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ लोटांगण बाबांची मूर्ती आहे. स्थानिक आख्यायिकेनुसार, लोटांगण बाबा हे देवीचे निस्सीम भक्त होते. नवरात्रोत्सवाच्या काळात ते साडेतीन शक्तीपीठांच्या दर्शनासाठी वारी करत असत. मात्र, वृद्धापकाळामुळे त्यांना ही वारी करणे शक्य होईना. देवीच्या दर्शनासाठी जाता येत नसल्याने ते व्यथित झाले. त्यावेळी देवीने त्यांना सर्व शक्तीपीठांचे दर्शन एकाच ठिकाणी घडेल, असा दृष्टांत दिला, अशी श्रद्धा सांगितली जाते. या आख्यायिकेशी कोल्हार भगवतीपूरच्या मंदिराचे वैशिष्ट्य जोडले गेले आहे. त्यामुळे येथे येणारे भाविक भगवती मातेच्या दर्शनासोबत लोटांगण बाबांचेही दर्शन घेतात. विजयादशमीच्या निमित्ताने या आख्यायिकेचे स्मरण भक्तांच्या मनात श्रद्धेची भावना अधिक दृढ करते.

**नवरात्रोत्सवाची सांगता विजयादशमीने**

कोल्हार भगवतीपूर येथे घटस्थापनेपासून विजयादशमीपर्यंत नवरात्रोत्सव भक्तिभावाने साजरा केला जातो. नऊ दिवस मंदिरात पूजा-अर्चा, धार्मिक विधी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. अनेक महिला मंदिरात घटस्थापना करतात, तर काही भाविक उपवास आणि देवीच्या आराधनेत नऊ दिवस घालवतात, अशी स्थानिक परंपरा आहे.

अष्टमीला नवचंडी यज्ञाला प्रारंभ होतो, तर नवमीला पूर्णाहुती दिली जाते. मंदिराला फुलांनी सजवले जाते आणि विद्युत रोषणाईने परिसर उजळून निघतो. देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांमुळे मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होते. विजयादशमीच्या दिवशी नवरात्रोत्सवाची सांगता होत असताना देवीचे दर्शन घेणे, नव्या संकल्पांची सुरुवात करणे आणि सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करणे, याला भाविकांच्या दृष्टीने विशेष महत्त्व असते.

**मंदिराचा प्राचीन इतिहास आजही गूढ**

भगवती मातेच्या मंदिराची स्थापना नेमकी कधी झाली, याबाबत निश्चित माहिती उपलब्ध नाही. मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या वेळी जमिनीत सुमारे ५० ते ६० फूट खोलवर खोदकाम करण्यात आल्याची स्थानिक माहिती आहे. मात्र, मंदिराच्या स्थापनेची तारीख निश्चित करणारा शिलालेख किंवा अन्य ठोस पुरावा मिळाला नसल्याचे सांगितले जाते. त्यामुळे मंदिराचे नेमके प्राचीनत्व निश्चित करण्यासाठी ऐतिहासिक दस्तऐवज आणि पुरातत्त्वीय संशोधन आवश्यक आहे.

पूर्वी मंदिर हेमाडपंथी स्थापत्यशैलीत असल्याचे सांगितले जाते. कालांतराने मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला आणि त्याला नवीन स्वरूप प्राप्त झाले. मंदिराच्या प्राचीनत्वाबाबत निश्चित पुरावे उपलब्ध नसले, तरी स्थानिक आख्यायिका आणि पिढ्यान्पिढ्या जपल्या गेलेल्या परंपरांमुळे या देवस्थानाचे धार्मिक महत्त्व टिकून आहे.

कोल्हाळेश्वर मंदिराशीही धार्मिक परंपरांचे नाते

कोल्हार भगवतीपूर परिसरातील कोल्हाळेश्वर मंदिराचाही उल्लेख स्थानिक धार्मिक परंपरांमध्ये केला जातो. प्रवरा नदीच्या किनाऱ्यावर वसलेल्या या परिसरातील मंदिराचे महत्त्व रामायण काळापासून असल्याची स्थानिक श्रद्धा आहे. या मंदिरातून भगवती मातेच्या मंदिरापर्यंत भुयार असल्याचे ग्रामस्थ सांगतात. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या नेवासे ते आळंदी प्रवासादरम्यान या मंदिरात मुक्काम झाल्याचा उल्लेख असल्याचेही स्थानिकांकडून सांगितले जाते. या संदर्भांची ऐतिहासिक सत्यता निश्चित करण्यासाठी स्वतंत्र पुराव्यांचा अभ्यास आवश्यक आहे.

**विजयादशमीला श्रद्धा आणि परंपरेचे स्मरण**

विजयादशमी हा केवळ नवरात्रोत्सवाच्या सांगतेचा दिवस नाही, तर चांगुलपणाचा विजय, नव्या कार्याचा प्रारंभ आणि सकारात्मक संकल्पांचा उत्सव म्हणूनही साजरा केला जातो. या मंगलदिनी भगवती मातेचे दर्शन घेण्यासाठी कोल्हार भगवतीपूर येथे येणाऱ्या भाविकांसाठी मंदिराचे धार्मिक महत्त्व विशेष आहे. शिर्डी आणि शनिशिंगणापूर या प्रसिद्ध तीर्थक्षेत्रांच्या वारीदरम्यान कोल्हार भगवतीपूरच्या भगवती मातेचे दर्शन घेता येते. साडेतीन शक्तीपीठांच्या दर्शनाची श्रद्धा, लोटांगण बाबांची आख्यायिका आणि नवरात्रोत्सवातील धार्मिक परंपरा यांमुळे हे देवस्थान वेगळे स्थान निर्माण करते.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# महिलांच्या श्रमदानातून पाणी अडविण्याचा निर्धार

## मवेशीत वनराई बंधारा ३० हून अधिक ग्रामस्थांचा सहभाग



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - पाण्याचा प्रश्न केवळ सरकारी योजनांवर सोडून न देता गावकऱ्यांनीच पुढाकार घेतला, तर जलसंधारणाची चळवळ लोकचळवळ होऊ शकते, याचा प्रत्यय मवेशी ग्रामपंचायतीच्या हद्दीतील बारववाडी (वैतागवाडी) येथे आला. येथील महिलांनी फावडी आणि गोण्या हातात घेत ग्रामस्थांसोबत श्रमदान केले आणि वनराई बंधारा उभारला. पर्यावरणप्रेमी राहुल राऊत यांच्या नियोजनातून साकारलेल्या या उपक्रमात २० ते २२ महिलांसह सुमारे दहा पुरुष सहभागी झाले.

तीन ते चार तास चाललेल्या श्रमदानात महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विशेष म्हणजे, कामासाठी आवश्यक साहित्य स्वतः आणत महिलांनी जलसंधारणाच्या कामात पुढाकार घेतला. महिलांची एकजूट आणि ग्रामस्थांची सामूहिक इच्छाशक्ती यातून उभा राहिलेला हा बंधारा केवळ पाणी अडविण्यापुरता मर्यादित नसून, गावाच्या पर्यावरण संवर्धनासाठी एकत्र येण्याचा संदेश देणारा ठरला.

पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून जमिनीत मुरविणे, भूजल पुनर्भरणाला हातभार लावणे आणि पशुपक्ष्यांसाठी पाण्याची उपलब्धता वाढविणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. पावसाच्या प्रत्येक थेंबाचे महत्त्व लक्षात घेऊन गावपातळीवर छोटे जलसंधारणाचे प्रयोग राबविण्याची गरज यातून अधोरेखित झाली. पर्यावरणप्रेमी राहुल राऊत यांच्या पुढाकारातून यापूर्वी सहा वनराई बंधारे, पशुपक्ष्यांसाठी पाच पाणवठे आणि जलशोषक चर तयार करण्याचे उपक्रम राबविण्यात आले आहेत.

बारववाडीतील या उपक्रमानंतर परिसरात आणखी पाच ते दहा वनराई बंधारे उभारण्याचा मानस सरपंच यमाजी भांगरे यांनी व्यक्त केला. ग्रामस्थांनी एकत्र येऊन जलसंधारणाच्या कामात सातत्याने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. अकोले पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अमरजी माने आणि राजूर वनपरिक्षेत्राचे वनपरिक्षेत्र अधिकारी डी. डी. पडवळे यांचे पर्यावरण संवर्धनाच्या उपक्रमांना मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. या श्रमदानात ग्रामपंचायत सर्व सदस्य यांच्यासह ग्रामस्थ सहभागी झाले. ग्रामपंचायत ऑपरेटर संजय भांगरे, ग्रामसेविका देशमुख, सरपंच यमाजी भांगरे आणि पर्यावरणप्रेमी राहुल राऊत उपस्थित होते. मोठ्या प्रकल्पांबरोबरच गावपातळीवर होणाऱ्या छोट्या प्रयत्नांतूनही जलसंधारणाला बळ मिळू शकते. प्रत्येक गावातील तरुणांनी एकत्र येऊन किमान एका वनराई बंधाऱ्यापासून सुरुवात करावी. पाणी अडविणे, जमिनीत मुरविणे आणि पशुपक्ष्यांसाठी पाण्याचा आधार निर्माण करणे ही काळाची गरज आहे, असे आवाहन पर्यावरणप्रेमी राहुल राऊत यांनी केले.

# गुंजाळवाडीत महिला बचत गट स्थापनेबाबत ऑनलाइन कार्यशाळा



युवावार्ता (प्रतिनिधी)

गुंजाळवाडी- सेवा संकल्प अभियानांतर्गत उमेद ग्रामसंवाद उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामपंचायत गुंजाळवाडी येथे महिला बचत गट स्थापन करण्याबाबत ऑनलाइन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. जिल्हा परिषद अहिल्यानगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री.आनंद भंडारी (भा.प्र.से.) व श्रीमती मंजुषा ठवकर प्रकल्प संचालिका यांनी या कार्यशाळेत मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेत महिला बचत गटांची स्थापना व नोंदणी, नियमित बचतीचे महत्त्व, गटाचे नियम व शिस्त, आर्थिक व्यवहारांची नोंदवही ठेवणे, बँक खाते उघडणे व बँक व्यवहार, शासनाच्या विविध योजनांची माहिती, बँक कर्जाच्या माध्यमातून आर्थिक उपक्रम उभारणे आणि महिलांना स्वयंरोजगार व उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देणे, या महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

ग्रामीण भागातील महिलांनी एकत्र येऊन बचत गटांच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, स्वतःचे उत्पन्न वाढवावे आणि कुटुंबाच्या आर्थिक विकासात सक्रिय योगदान द्यावे, यासाठी बचत गटांची भूमिका महत्त्वाची असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित करण्यात आले.या कार्यशाळेस ग्रामपंचायत गुंजाळवाडीचे सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्, ग्रामविकास अधिकारी, ग्रामस्थ तसेच गावातील महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे आयोजन गट विकास अधिकारी प्रविण सिनारे यांच्या मार्गदर्शना खाली तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, संगमनेर .प्रविण बारेकर, तालुका व्यवस्थापक उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांनी केले.

# सुभाष रामदास भुजबळ यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

तालुक्यातील साकूर येथील रहिवासी तथा भाजप ओबीसी मोर्चाचे संगमनेर तालुकाध्यक्ष सुभाष रामदास भुजबळ यांचे रविवारी रात्री पुणे येथील ज्युपिटर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असताना निधन झाले. ते ४२ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच साकूरसह संपूर्ण पठार परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. सुभाष भुजबळ यांनी स्वकर्तृत्वाच्या बळावर शून्यातून विश्व उभे केले होते. एलआयसीमध्ये कार्यरत असताना त्यांनी ग्राहकांशी प्रामाणिकपणाचे नाते जपत अनेकांना मदतीचा हात दिला. विमा क्षेत्रातील कामासोबतच सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातही त्यांनी सक्रिय योगदान दिले. भाजप ओबीसी मोर्चाचे संगमनेर तालुकाध्यक्ष म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली.

गेल्या दोन वर्षांपासून ते एका आजाराशी झुंज देत होते. मात्र, उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या अकाली निधनाने सामाजिक व राजकीय क्षेत्रातील एक सक्रिय व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना व्यक्त होत असून, साकूर पठार परिसरात शोककळा पसरली आहे.

सोमवार, दि. १९ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी साकूर येथील धुपेश्वर तिरावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, आई, वडील आणि भाऊ असा परिवार आहे.

# कोरेगाव भिमा जयस्तंभ बचाव समितीच्यावतीने जनजागृती कार्यक्रम



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शनिवार दिनांक १७ ऑक्टोबर रोजी व्यापारी असोसिएशन हॉल संगमनेर येथे कोरेगाव भिमा जयस्तंभ बचाव समितीचे अध्यक्ष समाजभूषण दादाभाऊ अभंग यांचे प्रमुख मार्गदर्शनाचा कार्यक्रम उत्तर अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने समितीचे महाराष्ट्र राज्याचे संघटक डॉ रविंद्र घोसाळे यांच्या नियोजनाने उत्तर अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष अगस्ती बनसोडे सरांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. अभंग साहेब यांनी कोरेगाव भिमा जयस्तंभ बाबत पुणे दिवाणी न्यायालयाच्या निकालामुळे आंबेडकरी जनतेत निर्माण झालेली संभ्रम अवस्था या निकालाचे विश्लेषण आणि जयस्तंभ अतिक्रमण व ताबा या करिता पुढील रणनिती या अत्यंत संवेदनशील व महत्वपूर्ण विषयांवर सन १९३० सालापासूनचे सर्व महत्वाचे दस्तऐवज पुराव्यानिशी उपस्थितांना अनमोल असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते सुरेशराव देठे, अगस्ती बनसोडे, विजयराव जगताप, अशोकराव दिवे, महेन्द्र खंडवे, माणिकराव यादव, सुधाकरराव रोहम, विनय घोसाळे, वाल्मीक चौधरी, विष्णू हरनामे, संतोष पवार, गायक भीमराव कदम, श्रीधर गायकवाड, सुदाम खरात, प्रा.बाबासाहेब गायकवाड, प्रा.शांताराम रायसिंग, चंद्रहार मोकळ, अशोक भालेराव, कैलास भालेराव, दिलीपराव रुपवते, आनंदराव जमधडे, भीमराव पारखे, बंटी यादव, विनोद गायकवाड, दिनकर वैराट, प्रकाश जगताप, दिनकर गायकवाड, वसंत भालेराव, सचिन साळवे, अशोक शिंदे, भरत भालेराव, जनार्दन गवांदे, बाबा मोकळ, अमोल कदम तसेच महिला प्रतिनिधी संध्या खरे, शैला भालेराव, संगिता मिसाळ, अर्चना भालेराव, सुकेशनी कांबळे, सुनिता भालेराव, संगीता जमधडे, सविता भालेरावसह अकोले, संगमनेर, राहाता, कोपरगाव, श्रीरामपुर, नेवासा, सिन्नर इत्यादी तालुक्यातील स्वाभिमानी भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विजयादशमी : संस्कृतीचा गौरव, माणुसकीचा जागर!

वाईटावर चांगल्याचा, असत्यावर सत्याचा आणि अधर्मावर धर्माचा विजय साजरा करणारा सण म्हणजे दसरा. बाह्य शत्रूंप्रमाणेच अंतर्मनातील विकारांवर विजय मिळविण्याचा संदेश देणारा हा उत्सव भारतीय संस्कृतीचे सामर्थ्य, वीरता, भक्ती आणि बंधुभाव यांचे प्रतीक आहे. भारतीय संस्कृतीत सण आणि उत्सवांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. हे सण केवळ परंपरा जपण्याचे माध्यम नसून, जीवनातील आनंद व्यक्त करण्याची आणि अंतर्मनातील चैतन्य जागृत करण्याची संधी असतात. हा आनंद कोणत्याही बाह्य किंवा भौतिक गोष्टींवर अवलंबून नसतो. भारतीय वेद, उपनिषदे आणि विविध धर्मग्रंथांनी अंतर्मनातील चिरंतन आनंदाचा मार्ग दाखविला आहे. आपल्या महान ऋषीमुनींनी या आनंदाची अनुभूती घेतली आणि मानवजातीला त्याचा मार्ग दाखविला. विजयादशमी अर्थात दसरा हा असाच आनंद, उत्साह आणि सकारात्मकतेचा संदेश देणारा मंगलमय सण आहे.



**विजयाचे प्रतीक असलेली विजयादशमी**

विजयादशमी हा हिंदू धर्मातील अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचा सण आहे. या सणाला दसरा, दशहरा, दशैन आणि विजयादशमी अशा विविध नावांनी ओळखले जाते. पौराणिक कथेनुसार, याच दिवशी दुर्गादेवीने चंडिकेचे रूप धारण करून महिषासुराचा वध केला. तसेच प्रभू श्रीरामांनी रावणाचा वध करून अधर्मावर धर्माचा विजय मिळविला, अशीही श्रद्धा आहे. त्यामुळे दसरा हा वाईटावर चांगल्याचा, असत्यावर सत्याचा आणि अन्यायावर न्यायाचा विजय दर्शविणारा सण मानला जातो. या सणाशी महिषासुरवध, रावणवध, पांडवांची कथा, शस्त्रपूजन, शमीवृक्षपूजन आणि शेतीपूजन अशा अनेक परंपरा जोडलेल्या आहेत. विजयादशमी हा केवळ धार्मिक सण नसून, तो कृषिसंस्कृतीशीही घट्ट नाते सांगणारा उत्सव आहे.

**सीमोल्लंघन : नव्या संकल्पांचा प्रारंभ**

दसऱ्याच्या दिवशी गावातील मंडळी एकत्र येऊन सीमोल्लंघन करतात. गावाची सीमा ओलांडून परंपरेनुसार शमीवृक्षाचे आणि मारुतीरायाचे दर्शन घेतले जाते. पावसाच्या कृपेने पिके बहरलेली असतात. अशा वेळी मारुतीरायाला बाजरीचे कणीस अर्पण करण्याची परंपरा काही भागांत आजही जपली जाते. यातून निसर्गाप्रती कृतज्ञता आणि कृषिसमृद्धीबद्दलचा आनंद व्यक्त होतो.

मात्र, सीमोल्लंघनाचा अर्थ केवळ गावाची सीमा ओलांडणे एवढाच मर्यादित नाही. आपल्या जीवनातील वाईट चालीरीती, अनिष्ट परंपरा, नकारात्मक विचार आणि दुर्गुण यांचा त्याग करून नव्या विचारांनी पुढे जाणे, हाही त्यामागील महत्त्वाचा संदेश आहे. जुन्या चुका मागे सोडून चांगल्या कार्याचा संकल्प करण्याचा हा दिवस आहे.

**शमीवृक्ष आणि आपट्याच्या पानांचे महत्त्व**

दसऱ्याच्या दिवशी शमीवृक्षाचे आणि आपट्याच्या पानांचे विशेष महत्त्व आहे. पौराणिक कथेनुसार, अज्ञातवासाच्या काळात पांडवांनी आपली दिव्य अस्त्रे शमीवृक्षावर लपवून ठेवली होती. त्यामुळे शमीवृक्षाची पूजा करण्याची परंपरा रूढ झाली, असे मानले जाते.

आपट्याची पाने एकमेकांना सोने म्हणून देण्यामागेही एक प्रसिद्ध पौराणिक कथा आहे. रघुराजा, कौत्स आणि त्यांचे गुरू वरतंतू यांच्या कथेनुसार, कौत्साने गुरुदक्षिणेसाठी चौदा कोटी सुवर्णमुद्रांची मागणी केली होती. रघुराजाने आपली सर्व संपत्ती दान केल्यामुळे त्याच्याकडे देण्यासाठी काही शिल्लक नव्हते. त्यानंतर त्याने कुबेराकडे संपत्तीची मागणी केली. कथेनुसार, कुबेराने शमीवृक्षावर सुवर्णमुद्रांचा वर्षाव केला. रघुराजाने त्या सुवर्णमुद्रा कौत्साला दिल्या. कौत्साने आवश्यक तेवढीच गुरुदक्षिणा स्वीकारून उर्वरित संपत्ती घेण्यास नकार दिला.

या कथेतून दानशूरपणा, त्याग, समाधान आणि संपत्तीपेक्षा मूल्यांना अधिक महत्त्व देण्याची शिकवण मिळते. सुवर्णमुद्रांचे प्रतीक म्हणून आपण आपट्याची पाने एकमेकांना देतो. या परंपरेतून परस्परांप्रती प्रेम, आदर आणि समृद्धीच्या शुभेच्छा व्यक्त केल्या जातात.

**वीरता, शक्ती आणि स्वाभिमानाचा उत्सव**

भारतीय संस्कृती ही वीरतेची पूजक आहे. व्यक्ती आणि समाजाच्या मनात धैर्य, स्वाभिमान आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची वृत्ती जागृत व्हावी, हा विजयादशमीचा महत्त्वपूर्ण संदेश आहे. रोग आणि शत्रू यांना वेळीच रोखले पाहिजे, अशी शिकवणही या उत्सवातून घेतली जाते. प्रभू श्रीरामांच्या काळापासून विजयादशमी हा विजयासाठी प्रस्थान करण्याचा दिवस मानला जातो. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनीही स्वराज्याच्या रक्षणासाठी पराक्रम, धैर्य आणि दूरदृष्टी यांच्या बळावर संघर्ष केला. त्यांच्या जीवनातून अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची आणि स्वधर्म व स्वराज्याचे रक्षण करण्याची प्रेरणा मिळते. दसऱ्याच्या दिवशी शस्त्रपूजन करण्याची परंपरा याच विचाराशी जोडलेली आहे. शस्त्र हे केवळ आक्रमणाचे साधन नसून, अन्यायाचा प्रतिकार आणि समाजाचे संरक्षण करण्याची जबाबदारीही त्यातून व्यक्त होते. आजच्या काळात या परंपरेचा अर्थ आपल्या कर्तव्याप्रती निष्ठा, धैर्य आणि समाजहितासाठी सज्ज राहणे असा घेता येईल.

**ज्ञानपूजन आणि कृषिसंस्कृतीचा गौरव**

विजयादशमीच्या दिवशी सरस्वतीपूजन आणि अपराजितादेवीचे पूजन केले जाते. घरातील पुस्तके, लेखनसाहित्य आणि ज्ञानार्जनासाठी उपयोगात येणाऱ्या वस्तूंची पूजा करण्याचीही परंपरा आहे. ज्ञान, विद्या आणि विवेक यांच्या बळावरच जीवनात खरा विजय मिळविता येतो, याची जाणीव या पूजनातून होते.

दसरा हा शेतीशी संबंधित महत्त्वाचा सणदेखील आहे. पावसाळ्यानंतर पिके तयार होण्याच्या काळात शेतकरी निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करतात. शेती, पशुधन आणि कृषी अवजारांविषयी आदर व्यक्त करणाऱ्या परंपरांतून भारतीय संस्कृतीचे निसर्गाशी असलेले अतूट नाते दिसून येते.

रावणदहनाबरोबर आत्मपरीक्षणही आवश्यक

दसरा हा बंधुभावाचा आणि सामाजिक एकतेचा उत्सव आहे. या दिवशी लोक पारंपरिक वेशभूषा करून मित्रमंडळी, नातेवाईक आणि आप्तस्वकीयांना भेटतात. आपट्याची पाने सोने म्हणून देऊन परस्परांना शुभेच्छा दिल्या जातात. आनंदाची देवाणघेवाण करताना नात्यांमधील प्रेम आणि जिव्हाळा अधिक दृढ होतो.

अनेक ठिकाणी दसऱ्याच्या दिवशी रावणदहन केले जाते. मात्र, रावणाच्या प्रतिमेचे दहन करण्याबरोबरच प्रत्येकाने स्वतःच्या अंतर्मनातील दुर्गुणांचेही दहन करण्याचा संकल्प केला पाहिजे. अहंकार, लोभ, मत्सर, द्वेष, अन्याय आणि अनैतिकता यांवर विजय मिळविणे आवश्यक आहे. विशेषतः स्त्रियांकडे पाहण्याची आपली दृष्टी कशी आहे, याचे आत्मपरीक्षण या दिवशी केले पाहिजे. आपली नजर स्त्रीचा सन्मान करणारी आहे की तिला केवळ उपभोगाची वस्तू समजणारी आहे, याचा प्रत्येकाने गांभीर्याने विचार करायला हवा. स्त्रीचा सन्मान, तिचे स्वातंत्र्य आणि तिची प्रतिष्ठा जपणे हीच खऱ्या अर्थाने संस्कृतीची पूजा आहे. दसरा म्हणजे हीन-दीन आणि लाचार मानसिकतेचा त्याग करून आत्मविश्वासाने उभे राहण्याचा दिवस. बाह्य शत्रूंवर विजय मिळवितानाच अंतर्मनातील विकारांवरही मात करणे आवश्यक आहे. भक्ती आणि शक्ती, ज्ञान आणि विवेक, पराक्रम आणि करुणा यांचा सुंदर संगम म्हणजे विजयादशमी. विजयादशमीचा खरा आनंद केवळ उत्सव साजरा करण्यात नाही, तर त्यातून मिळणारी शिकवण आपल्या आचरणात आणण्यात आहे. सत्याची कास धरणे, अन्यायाविरुद्ध उभे राहणे, स्त्रियांचा सन्मान करणे, निसर्गाप्रती कृतज्ञ राहणे आणि समाजात बंधुभाव वाढविणे, हे संकल्प आपण केले तरच दसऱ्याचा उत्सव खऱ्या अर्थाने सार्थ ठरेल. वाईटावर चांगल्याचा विजय आणि अंतर्मनातील दुर्गुणांवर सद्गुणांचा विजय साधण्याचा संकल्प करूया. विजयादशमीचा हा आनंदोत्सव प्रत्येकाच्या जीवनात सुख, समृद्धी, विवेक आणि चिरंतन आनंद घेऊन येवो!

**प्रा. शशांक गंधे**
**मो.९८९०१६३६४२**

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जड्ड डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28






# अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेजला राष्ट्रीय पातळीवरील ६ पुरस्कार





बदलत्या तंत्रज्ञानानुसार व उद्योग जगताच्या गरजेनुसार विद्यार्थ्यांना नवीन प्रशिक्षण, गुणवत्तापूर्ण उद्योगाभिमुख शिक्षण याचबरोबर कॉम्प्युटर आणि एआयतंत्रज्ञान वापर, परदेशी भाषा अशा विविध सुविधा दिल्या जात आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणातून देशाचे आदर्श युवक घडवण्याचे काम अमृतवाहिनीतून सातत्यपूर्ण होत आहे. मिळालेले पुरस्कार हे सामूहिक यश असून या पुढील काळातही अधिक गुणवत्तेने काम करण्यास प्रोत्साहन मिळेल.

सौ. शरयूताई देशमुख

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्याचे माजी शिक्षण मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली उच्च तांत्रिक शिक्षणामध्ये गुणवत्ता,व्यक्तिमत्व विकास, उत्कृष्ट निकालाची परंपरा विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कंपन्याशी समन्वय, विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक सुविधा संशोधन शिस्त आणि सुंदर वातावरण असणाऱ्या अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाला राष्ट्रीय पातळीवरील ६ पुरस्कार प्राप्त झाले असून अमृतवाहिनीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असल्याची माहिती प्राचार्य डॉ.प्रसाद बाविस्कर यांनी दिली आहे.

अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाला राष्ट्रीय पातळीवर मिळालेल्या विविध सहा पुरस्कारांच्या बाबत माहिती देताना प्राचार्य डॉ.बाविस्कर म्हणाले की, माजीमंत्री बाळासाहेब थोरात मा. आ. डॉ. सुधीर तांबे व संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त सौ. शरयू ताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाने गुणवत्तेमधून देशपातळीवर आपला लौकिक निर्माण केला आहे.

राजस्थान जयपूर येथे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीत यावर्षी उद्योग व शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट योगदनाबद्दल आयोजित नॅशनल लेवल इंडस्ट्री अकॅडमी कॉन्क्लेव्ह एज्युकेशन एक्सलन्स अवॉर्ड २०२६ मध्ये विविध क्षेत्रांमधून अमृतवाहिनीला सहा पुरस्कार मिळाले आहेत. यामध्ये बेस्ट परफॉर्मिंग इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट अवॉर्ड २०२६, तर वाधवानी फाउंडेशन बेस्ट परफॉर्मिंग इन्स्टिट्यूट अवॉर्ड, मायक्रो चीप सेंटर ऑफ एक्सलन्स, फाईव्ह इयर्स ऑफ पार्टनरशिप अवार्ड, वन मिलियन वर्च्युअल इंटरशिप यशस्वी योगदान पुरस्कार, इलेक्ट्रिक इंजीनियरिंग विभागाला उत्कृष्ट डिपार्टमेंट पुरस्कार, असे वेगवेगळे सहा पुरस्कार मिळाले.

उद्योग विश्वातील बदलत्या तंत्रज्ञानानुसार विद्यार्थ्यांना ए आय क्लाऊड कॉम्पिटिंग अँड सायबर सिक्युरिटी यासारख्या अत्याधुनिक कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम बनवल्याबद्दल महाविद्यालयाचा विशेष गौरव करण्यात आला.

अमृतवाहिनीला मिळालेल्या या पुरस्काराबद्दल मा.महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त सौ. शरयूताई देशमुख, डॉ. जयश्रीताई थोरात, अनिल शिंदे, प्रा. व्ही. बी. धुमाळ यांच्यासह विविध मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# संगमनेरात चाळीस गोवंशीय जनावरांची सुटका

साडेदहा लाखांचा मुद्देमाल जप्त



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - स्थानिक गुन्हे शाखेने संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अवैध कत्तलखान्यांवर रविवारी पहाटे सव्वादोनच्या सुमारास दोन ठिकाणी धाड टाकून मोठी कारवाई केली आहे. या धडक कारवाईत पोलिसांनी एकूण १० लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, तब्बल ४० जिवंत लहान-मोठ्या गोवंशीय जनावरांची सुटका करण्यात यश मिळवले आहे. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या पथकाने ही कारवाई केली. जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे उच्चाटन करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेची विशेष पथके तैनात करण्यात आली होती. संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गोवंशीय जनावरांची कत्तल व गोमांस विक्री सुरू असल्याची गुप्त माहिती पथकाला मिळाली. माहितीच्या आधारे पोलिसांनी रविवारी पहाटे जमजम कॉलनी गल्ली क्रमांक १ समोरच्या काटवनातील मोकळ्या जागेत तसेच मदिनानगर व कादरीनगर अशा तीन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकले. या ठिकाणी महाराष्ट्र राज्यात गोवंशाची कत्तल व गोवंश मांसविक्रीस बंदी असतानाही कत्तलीच्या उद्देशाने चारा व पाण्याविना निर्दयीपणे बांधून ठेवलेली सुमारे ४० लहान-मोठी जनावरे मुक्त केली. संगमनेर शहरातील दोन ठिकाणच्या छाप्यांमध्ये अनुक्रमे ४ लाख आणि ६ लाख ६० हजार रुपये किमतीची एकूण ४० लहान-मोठी जिवंत गोवंशीय जनावरे हस्तगत करण्यात आली आहेत.

# बिबट्याच्या हल्ल्यात कालवड ठार



युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी - संगमनेर तालुक्यातील दाढ खुर्द येथे शनिवारी मध्यरात्री दोन वाजेच्या सुमारास दोन बिबटयांनी अचानक हल्ला करत कालवडीचा फडशा पाडला. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

दाढ खुर्द येथील शेतकरी अविनाश बाबुराव जोशी यांच्या गोठयात शनिवारी रात्री दोन बिबट्यांनी झडप टाकली. बिबट्यांनी कालवडीवर हल्ला करून तिला जागीच ठार केले आणि तेथून ओढून नेण्याचा प्रयत्न केला. शेतकरी अविनाश जोशी यांनी बिबट्या कालवडीला तोंडात धरून घेऊन जात असताना प्रत्यक्ष पाहिले. त्यांनी आरडाओरड केल्यानंतर बिबट्याने कालवडीला सोडून तेथून पळ काढला.

या घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे वनरक्षक रामेश्वर मंडपे, वनकर्मचारी उत्तम भुसारी व नजीर शेख यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आणि घटनेचा पंचनामा केला. वनविभागाने तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी सरपंच सतीश जोशी यांनी केली आहे. या भागात नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने पिंजरा लावण्याची मागणी सरपंच सतीश जोशी, नारायण कहार, अशोक जोशी, भागवत जोरी, सार्थक जोशी, प्रतीक जोशी, मयूर जोशी, बाबुराव जोशी व महेश जोशी यांनी केली आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड , तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

# राज्यस्तरीय पुरस्काराची दहा हजार रक्कम आधारच्या गरजू मुलांसाठी



युवावार्ता (प्रतिनिधी)

राष्ट्रपती पारितोषिक विजेते सोमनाथ कळसकर प्रतिष्ठान संगमनेरतर्फे दरवर्षी राज्यात उत्कृष्ट काम करणाऱ्या दोन शिक्षकांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात येतो. यावर्षी बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील आनंदगाव जिल्हा परिषद शाळेचे हरहुन्नरी, उपक्रम शील, तंत्रस्नेही, प्रतिभाषाली, सामाजिक भान असणारे विद्यार्थीप्रिय शिक्षक नारायण राजेसाहेब झोडगे यांना संगमनेर, जिल्हा अहिल्यानगर येथे देण्यात आला. सदर पंधरा हजार रुपयांच्या पुरस्कारातील दहा हजार रुपये नारायण झोडगे सर यांनी निराधार व गरजू मुलांच्या शिक्षणासाठी काम करणाऱ्या आधार फाउंडेशन संगमनेर या संस्थेला दिले. तर उर्वरित रक्कम स्वतःच्या आनंदगाव येथील जिल्हा परिषद शाळेसाठी दिली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शिक्षणतज्ञ संजय मालपाणी, सोमनाथ कळसकर गुरुजी, प्रतिष्ठानचे अध्यक्ष रामनाथ कळसकर, शिवव्याख्याते प्रा. दिपक कर्पे, शिवराष्ट्र ट्रेकर्स परिवार महाराष्ट्र, माजलगाव येथील विजयसिंह सोळंके, कृष्णा तौर, पुरुषोत्तम जाधव, आधार फाउंडेशन संस्थेचे संपादक किसनभाऊ हासे, संतोष शेळके, सोमनाथ मदने, सुखदेव इल्हे, विठ्ठल कडूसकर, आदर्श शिक्षक लहू बोराटे, किसन आहेर, रामदास कापसे, दिलीप धुमाळ, सोमेश्वर मोरे राजकुमार सोनपसारे, जीवन डोंगरे, विनोद ठोंबरे आदी उपस्थित होते.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165




कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
सर्जरी विभाग | डायलिसीस विभाग | हृदयरोग विभाग | जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग - सुपर स्पेशालिटी विभाग - मेडिसीन विभाग - स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग - न्यूरोविभाग - अद्ययावत कॅथलॅब - मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६



डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.)
Physician & Anasthhetist



डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.)
Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25